
माधव भट
कार्तिकी भट
निवडक
अनुभव
नव्या
शब्दात

# निवडक अनुभव- नव्या शब्दात

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# निवडक अनुभव- नव्या शब्दात

(कथासंग्रह)

लेखक

माधव भट आणि कार्तिकी भट

# निवडक अनुभव- नव्या शब्दात (कथासंग्रह)

## लेखक: माधव भट आणि कार्तिकी भट

### मुखपृष्ठ: कार्तिकी भट


Kartiki Bhat
707 Continental Circle,
Mountain View, CA, US - 94040
kartikibhat14@gmail.com
Phone: +1 6504224359

Madhav Bhat
707 Continental Circle,
Mountain View, CA, US - 94040
dr.madhav.bhat@gmail.com
Phone:+ 1 4083983311



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.in
www. esahity. com
esahity@gmail. com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.

**प्रकाशन : २० जून २०२०**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.



कार्तिकी भट परिचय

माझं बालपण पुण्यात गेलं. पुणे हे शिक्षणाचे माहेर घर समजले जाते आणि त्याचा मला खरंच लाभ झाला. मित्र मैत्रिणी, शेजारी यांच्याकडून अनेक पुस्तकं घरी आणून वाचली. पुण्यात पुस्तकांची अनेक दुकानं फिरण्यात खूप मजा यायची. घरी चांदोबासारखी मासिकं यायची, आणि बोक्या सातबंडे किंवा चिंटू नी हशा पिकायचा. एनिड ब्लीटण ची अनेक लहान मुलांची पुस्तकं इंग्रजीमध्ये वाचली तेव्हा वाटलं की अशी पुस्तकं मराठी भाषेतसुद्धा लिहिली गेली पाहिजेत. साधारण चौथीत असताना एका मैत्रिणीबरोबर लिहिलेली गोष्ट पहिल्यांदा किशोर मासिकात छापून आली तेव्हा गंमत वाटली. पुस्तक वाचन तर चालूच आहे. कॉलेजचंसुद्धा मासिक होतं. प्रवास करताना प्रवास वर्णन लिहून ठेवण्याची सवय आहे. ते काही दिवसांनंतर वाचून आठवणी जाग्या होतात. काळाला अनुसरून लिहायचे असेल तर नवीन साहित्य निर्मिती होत राहावी हीच इच्छा. त्या दिशेने केलेला हा एक छोटासा प्रयत्न आहे. ही संधी ईसाहित्यने दिली त्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद.

माधव भट परिचय



माझे बालपण आणि तारुण्य हे अशा महाराष्ट्रात गेले जेव्हा समाज प्रबोधन आणि सुधारणावादी किंवा समाजवादी लेखक नाट्य कलावंत जसे सुरेशभट, लक्ष्मण माने किंवा कोसला कार किंवा नाट्यक्षेत्रात श्रीराम लागू, जब्बार पटेल, निळू फुले, मोहन आगाशे आणि इतर असंख्य एकीकडे तर शुद्ध मनोरंजन पर लेखन करत समाज बदलांचे प्रतिबिंब दाखवणारे पू भा भावे, ग दी माडगूळकर, पू ल देशपांडे, व पू काळे, लक्ष्मण राव देशपांडे, द मा मिरासदार, रमेश मंत्री आणि इतर असंख्य दुसरीकडे यांचा बोलबाला होता. ती पिढी रेडिओ आणि पुस्तकांवर आणि नाट्यमंदिरात आपले भावविश्व समृद्ध करत होती.

शालेय जीवनात कविता लेखन तर कॉलेज जीवनात एकांकिका लेखन, अभिनय आणि नंतर वर्तमानपत्रात टोपणनावाने तात्कालिक घटनांवर स्फुटे अशा स्वरूपात मी माझी साहित्यिक आवड काही प्रमाणात पूर्वी जोपासली आहे. आज डिजिटल क्रांतीचा फायदा घेवून एका नव्या उमेदीने मी माझ्या काही लघुकथा घेऊन आपल्या भेटीस येत आहेत.

|| श्री ||

आयुष्यातील

सुंदर आणि

उदबोधक

क्षणांना

अर्पण

# अनुक्रमणिका

अन्नपूर्णा व्रत

खरीखुरी इंटर्नशिप

संस्कृती

मनोरंजनाचे नवे मार्ग

दांडेलीची सहल

'ग' ची बाधा

नरेन्द्र आणि पाणीपुरी

संगीतातील क्रियापदे

**या कथा काल्पनिक आहेत. कुठल्याही व्यक्ती, घटना किंवा स्थळाशी साधर्म्य आढळल्यास तो योगायोग समजावा**

# अन्नपूर्णा व्रत

दाराची बेल वाजली म्हणून मी जाऊन दरवाजा उघडला. बाहेर सरस्वती बाई उभ्या होत्या. मला बघून हसल्या. मी दार उघडून म्हटले, "या ताई या!" त्या आत येता येताच म्हणाल्या, "कसा आहेस मकरंद?" सरस्वती बाई स्वयंपाकघराकडे गेल्या, मी माझ्या अभ्यासिकेकडे वळलो! सरस्वती बाई माझ्यापेक्षा 15-17 वर्षांनी तरी मोठ्या असतील, त्यामुळे पूर्वीपासून मी त्यांना ताईच म्हणायचो. मला अजूनही माझी त्यांची झालेली पहिली भेट आठवते.

माझ्या वडीलांचे घनिष्ट मित्र संभाजीराव यांचे आग्रहाचे निमंत्रण असल्याने मी दिवाळीच्या सुट्ट्या घालवायला उंबरगावला गेलो होतो तेंव्हा मी जेमतेम 17 वर्षांचा होतो. मी एसटी बसने सकाळी बाराचे सुमारास पोचलो आणि सरळ त्यांचा घरी गेलो. तसेही दुपारचे बारा वाजले होते आणि त्यावेळेस माझे स्वागत झाले ते मराठी स्वयंपाकाच्या सुगंधाने! गरम पोळया, छान गरम मसाला आमटी, कढईत उकळणारी रस्सा भाजी यांचा जो काय एक एकत्रित सुगंध येत होता त्याने माझ्या पोटात भुकेचा अग्नि अजूनच

पेटला. दारातून आत गेलो तो संभाजीरावांच्या नोकराने माझी विचारपूस केली आणि तो आत खबर द्यायला गेला. माजघरातून संभाजीरावांचा दणदणीत आवाज आला. “येरे मकरंद, हातपाय धुवून जेवायला ये!”

आणि मग मी काय जेवलोय म्हणून सांगू! आणि त्या पंधरा दिवसात मी असा सरस्वती बाईंच्या हातच्या वेगवेगळया सुग्रास पदार्थांचा भरपूर आस्वाद घेतला. सरस्वती बाईना बोलायला तसा फारसा वेळ नसे! हसून एक दोन वाक्यात विचारपूस करून त्या स्वयंपाकात मग्न होऊन जात!.

नंतर मला कळले की त्या जशा संभाजीरावांकडे स्वयंपाक करायला येत होत्या तशाच आणिक बरेच ठिकाणी स्वयंपाक करायला जात होत्या! दुसऱ्यांची जमीन खंडाने कसणाऱ्या पतीचे लवकर निधन झाले आणि तीन मुलांचा आणि वृद्ध सासऱ्याचा भार त्यांच्यावर पडला होता.

संभाजीरावांचा पसारा मोठा असला तरी त्यांना समाधान नव्हते. त्यांचा मोठा मुलगा शिकला असला तरी काही काम करत नव्हता. धाकटा चंचल स्वभावाचा आणि मौज मजेत वेळ घालवत

होता. मुलगी हिन्दी सिनेमाची गाणी ऐकणे आणि कादंबऱ्या वाचन यात वेळ घालवत होती. तिचे कॉलेजकडे लक्ष नव्हते. पत्नीचा वेळ शेजारी राहणाऱ्या बायकांशी गप्पा मारणे आणि सासू सुनेची धुसफुस चवीने ऐकणे यातच जात होता!

मी तेथे असताना एक विचित्र घटना घडली.

कुठला तरी सणाचा दिवस होता बहुतेक कुलदेवतेच्या पूजेचा असावा. सरस्वती बाई सकाळी जरा उशिरा पण गडबडीत आल्या. बहुतेक बाकी काही घरचा स्वयंपाक करून आल्या असाव्यात. त्यांचा चेहरा उपास करून आणि सकाळपासून काम करून थकलेला दिसत होता. बाई पुरण, वरण आणि असा सगळा स्वयंपाक घाई घाईने करत होत्या. दुपारचे बारा वाजून गेले. पुरणाचा नैवेद्य घाई घाईने देवापुढे ठेवून त्यांनी सगळया कुटुंबाची पाने वाढली. खाली बसा, परत उठा आणि ताट पाट मांडलेल्या पंगतीपुढे वाकून वाढा, अशी त्यांची धावपळ उडाली होती.

तेवढ्यात संभाजीरावांच्या मुलीने, मोठ्या मुलाने आणि धाकट्याने एकांचवेळेस पुरणपोळी, भात, भाजी असे वेगवेगळे

पदार्थ मागीतले. सरस्वती बाई गडबडीत चुलीसमोरून उठल्या आणि वाकून वाढता वाढता त्यांचा तोल गेला. उपास आणि सकाळ पासून केलेले कष्ट आणि धावपळ त्यांना सोसली नाही. त्यांना भोवळ आली. त्या ग्लानितच खाली पडल्या. काही क्षणात शुद्धीवर आल्या तशा चटकन उठून बसल्या. कपाळावर आलेले टेंगूळ लुगड्याच्या पदरात हाताने दाबून काही वेळ तिथेच बसून राहिल्या.

संभाजीरावांच्या पत्नी आणि मुलीची बडबड लगेच सुरू झाली. होत नाही तर एवढी कामे घेता कशाला, सणाच्या दिवशी पंगतीपुढे बरा मुहूर्त सापडला पडायला. वगैरे वगैरे वगैरे!

संभाजीराव सगळे शांतपणे काही वेळ बघत होते. पण काही वेळ सतत चाललेली बडबड ऐकल्यावर त्यांचा संयम सुटला. “गप्प बसा!” ते जोरात ओरडले! पुढे काही बोलण्याऐवजी ते काही क्षण सरस्वती बाईंच्या ओढलेल्या थकलेल्या चेहऱ्याकडे बघत बेचैनीत बसून राहिले!

थोड्या वेळाने त्यांना काय वाटलं कोण जाणे पण त्यांनी कठोर शब्दात हुकूम सोडले. सरस्वतीबाईना त्यांनी समोर पाटावर बसायला सांगितल. पत्नी, मुलीला उरलेला सगळा स्वयंपाक करायला बसवलं. मोठ्या आणि धाकट्या मुलाकडे सरस्वती

बाईसमोर पान मांडून त्यांना नीट वाढण्याचे काम दिले. सरस्वती बाईंचे जेवण नीट पूर्ण होईपर्यंत सगळी तेथे नीट काम करताहेत की नाही हे ते स्वतः बघत होते. त्यांचा रुद्रावतार बघून कोणाची उलट बोलण्याची हिम्मत झाली नाही. सगळे काम झाल्यावर संभाजीरावांनी जाहीर केले की हे असे जेवण सरस्वतीबाईंसाठी दर महिन्याच्या पहिल्या रविवारी बनवण्याचे काम पत्नी आणि मुलीचे राहील. जेवण पूर्ण असावे, अगदी पूरण पोळी आणि इतर सर्व पदार्थासकट! वाढण्याचे काम दोन्ही मुले करतील! हे असे नीट घडले नाही तर संभाजीराव त्या महिन्यात घरात खर्चाला पैसे देणार नाहीत.

पुढे मी आठ दिवसांनी माझ्या घरी परतलो आणि कॉलेज शिक्षणासाठी मुंबईत आलो. शिक्षण आणि पुढे मुंबईत नोकरी आणि पैसा मिळवण्यासाठी करायच्या धूमश्चक्रीत मी पूर्ण अडकलो. पंधरा सतरा वर्षे उलटून गेली. संभाजीराव आणि त्यांच्या कुटुंबाशी संपर्क खूप कमी झाला. मी मुंबईत जागा घेतली आणि स्थायिक झालो. एक दिवस अचानक माझ्या अपार्टमेंटमधून बाहेर पडताना गेट जवळ मला जुना ओळखीचा चेहरा दिसला. सरस्वती बाई वयस्कर झाल्या होत्या पण आता सुखवस्तू दिसत होत्या. माझ्या अपार्टमेंटमध्येच वरच्या मजल्यावर त्यांची मुलगी

राहायला आली होती. तिच्याकडे त्या काही दिवस राहायला आल्या होत्या.

“खूप कष्ट केले माझ्या मुलांनी!” सरस्वती बाई सांगत होत्या, “आता सगळे सुखात आहेत, आपापल्या संसारात! घरी ठेवून घेतात! गावाला जाऊ देत नाहीत!”

मी त्यांना घरी बोलावले, पत्नीची आणि त्यांची ओळख करून दिली. मुलीकडे असल्या की त्यांचे माझ्या घरी येणे जाणे असते. माझ्या पत्नीला त्यांचेकडून जुन्या जुन्या पारंपरिक पदार्थ बनवण्याच्या पाकक्रिया शिकण्याची मोठी आवड! एकदा मी सरस्वती बाईना सहज विचारले, “संभाजीराव अँड फॅमिली कसे आहेत?” “आरे खूप छान आहेत! मोठ्या मुलगा व्यवसाय / शेती सर्व बघतो, धाकटा सरकारी नोकरीत आहे, मुलगी पुण्याला आहे आयटीमध्ये! सर्व मुले खूप समंजस आहेत आणि कष्ट करणारी आहेत!” सरस्वती बाई सांगत होत्या.

“काय सांगता? मी फार वर्षांपूर्वी आलो होतो त्या वेळेस तर अशी परिस्थिती नव्हती हो?” मी जरा खोचक पणे विचारले. “तुम्हाला दर महिन्याला स्वयंपाक करून जेवण वाढण्याचा नियम पाळणं तरी जमलं का कधी त्यांना?” मी माझ्या प्रश्नावलीत भर टाकली.

“अरे अंगावर काम पडलं की सवयी बदलतात..! आणि सवयी बदलल्या की आपोआप माणसं बदलतात बाबा!” हसून सरस्वती बाई म्हणाल्या. “मला पुरणाचे जेवण महिन्यातून एकदा वाढण्याचा नियम त्यांना संभाजीरावांनी कधी मोडू दिला नाही!” त्यांनी पुढे उत्तर जोडले. “आजून गावाकडे असले की मला त्या घरी जेवण्याचं आमंत्रण असतं!”

“म्हणजे अन्नपूर्णा व्रत केल्याचे फळ मिळाले म्हणायचे त्यांना!” मी चेष्टेच्या सुरात म्हणालो.

“काहीतरीच बोलतो मकरंद तू” सरस्वती बाई म्हणाल्या, “अरे त्यांनी आणि गावातल्या अनेक घरानी मला काम दिलं आणि मदत केली इतकी वर्षे, म्हणून मी माझ्या पोरांना पोसू शकले बाबा!”

मी हसलो आणि पत्नीने समोर ठेवलेल्या जेवणावर ताव मारला. पत्नीने शिजवलेल्या जेवणाचा रस आणि गंध मनात साठवलेल्या फार वर्षांपूर्वीच्या गावांकडील चवीची आठवण करून देत होता!

# खरीखुरी इंटर्नशिप

टीना शाळेत नेहमी अव्वल मार्कांनी उत्तीर्ण होणारी मुलगी. १० वी उत्तम गुणांनी पार पडली. १२ वी मध्ये उत्कृष्ट गुण मिळाल्यावर तिला एका नावाजलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यावर घरच्यांच्या आनंदाला काही सीमाच उरली नव्हती. घरच्यांना वाटलं आता टीनाचं करिअर बनलं.

टिनाच्या महाविद्यालयात अनेक मैत्रिणी झाल्या. ती आता निवांत झाली होती. शिक्षक शिकवतील ते जमेल तसं रांगेतल्या शेवटच्या बाकावर बसून ऐकायचं. परीक्षेच्या आदल्या दिवशी रात्री जागून अभ्यास करायचा. प्रात्यक्षिकं व्हायची. कॉलेजमध्ये आधुनिक यंत्र बरीच होती. प्रात्यक्षिक सांगीतलेल्या कृतीप्रमाणे पूर्ण केली की वही इथून तिथून बघून भरून काढायची. फावल्या वेळात कॉलेजच्या छोट्या उपहारगृहात वडा पाव आणि चहाचा भरपूर आनंद घ्यायचा. गप्पा मारायच्या. जवळच्या बाजारात खरेदी करायला जायचं. तर कधी कॉलेज मधल्या बॅडमिंटन स्पर्धांमध्ये खूप खेळायचं. वेगळ्या वेगळ्या सामाजिक क्लबमध्ये जाऊन अनेक विषयांवर चर्चा लढवायच्या.

तिसरं वर्ष संपत आलं तसं कॉलेज मधली मुलं वेगवेगळ्या प्रोजेक्ट्समध्ये भाग घेत होती. आणि उन्हाळयाच्या सुट्टीत इंटर्नशिप करण्याच्या मार्गावर होती. टीनाच्या मैत्रिणी मात्र या विषयावर फारसं काही बोलत नव्हत्या. काही मुलांनी टीनाला विचारलं की तिचं काही ठरलं आहे का सुट्टीसाठी. सारखी आजूबाजूला इंटर्नशिपची चर्चा ऐकून टीनाला वाटलं आता आपणसुद्धा काहीतरी प्रयत्न करायला हवे. पहिला प्रयत्न तिने बाबांजवळ केला. बाबा त्यांच्या कामात मग्न होते. त्यांनी शेवटी टिनाची बडबड ऐकून सांगितलं, "टीना, तू एवढी हुशार मुलगी तुला गुणसुद्धा नेहमी चांगले असतात तुला खरंच गरज आहे का या इंटर्नशिप ची? जा आता मला काम करू दे". पहिल्या मार्गात काहीच यश न मिळाल्याने टीनाकडे आता एकाच मार्ग उरला होता. आई. आईला जाऊन तिने तातडीने तिची डिमांड सांगितली आणि पुढचे दोन दिवस इंटर्नशिप ह्या विषयावर पिडलं. आईने शेवटी एक मार्ग सुचवला, "टीना तू तुझ्या मित्र मैत्रिणींना आणि शिक्षकांना विचार ना? मी पण माझ्या ओोळखीच्या लोकांना विचारते".

दुसऱ्या दिवशी चमत्कार घडला. एका शिक्षिकेने सांगितलं की एका मोठ्या बहुराष्ट्रीय कंपनीने काही इंटर्नशिपच्या जागा रिकाम्या

असल्याचं सांगितलं होतं. पण जागा कमी असल्यामुळे त्यांनी चाचणी परीक्षा घ्यायचं ठरवलं होतं. लेखी परीक्षेत ती, तिची एक मैत्रीण आणि दोन मुलं अशी उत्तीर्ण झाली. त्यामुळे त्याना कंपनीच्या ऑफिसला तोंडी परीक्षेसाठी बोलावण्यात आले. टीनाने आई-बाबांना सांगितल्यावर ते खुश झाले. टीनाने ऑफीसचा पत्ता शोधला, ऑफिस बरच लांब असल्यामुळे आधी बघून ठेवलं.

शिक्षकांनी सांगितल्या प्रमाणे टीना आणि उरलेली सगळी मुले कॉलेजचा गणवेष घालून तोंडी परीक्षेला बरोबर नऊ वाजता हजर झाली. खूप मोठ्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर ते गेले. लिफ्टमधून बाहेर पडताच मारबल फ्लोअर आणि पांढऱ्या शुभ्र रंगवलेल्या भिंतीवर एक भलं मोठं चित्रं लटकवल होतं. समोर एका चकचकीत काचेच्या टेबलावर भरपूर लिपस्टिक लावलेली एक रिसेपशनिस्ट बसली होती. सगळी भव्यता निरखत ते तिच्याकडे गेले. तिने त्यांना बाजूच्या एका सोफ्यावर काही वेळ बसायला सांगितले.

समोरच्या लिफ्टमधुन कामावर येणारे सोफ्यावर बसलेल्या विद्यार्थ्यांना न्याहाळत होते. त्यांच्याकडे एक शंकेखोर नजर टाकून

ते आपापले कार्ड स्कॅन करून कंपनीच्या मुख्य ऑफिसमध्ये प्रवेश घेत होते. तिथे त्या दिवशी फॉरीनमधून लोक आले होते. त्यांना तर मजाच वाटत होती. कारण कॉलेजचा पोशाख हा काळपट पांढऱ्या आणि फिकट निळया रंगांच्या छटांनी बनलेला होता. मुलींना एक ढगळी सलवार आणि कुडता आणि पिनांनी नीट चापूनचोपून बसवलेली सुळसुळीत ओढणी. मुलांना एक सुळसुळीत पांढरा शर्ट, काळी पॅन्ट आणि आयुष्यात पहिल्यांदाच लावलेला असल्यामुळे एक वेडावाकडा टाय. त्या उलट कंपनीचे लोक इस्त्री करून विलायती उत्तम मापाच्या कपड्यांमध्ये शोभून दिसत होते.

टीनाला आत बोलावण्यात आले. कंपनीचा एक माणूस प्रश्न विचारायला बसला होता. पहिला प्रश्न, "तू हे जे सॅंडल घातले आहेत ते घालणं तुला योग्य वाटतं का?". टीनाचं उत्तर, "हो. अयोग्य आहे का ते?". कंपनीचा माणूस, "इन्टेर्वीयुला येताना पंप शूज घालायचे माहित नाही का तुला!". आणि मग आले अनेक प्रश्न अभियांत्रिकी विषयांवर आधारित. त्यांची उत्तरे देता आली तशी टिनाला. कंपनीच्या माणसाने शेवटचा प्रश्न विचारला, "पुढच्या २ वर्षात तुझं काय काम करायचं याबद्दल काय ठरलंय?". टीना म्हणाली, "अजून तसं काही ठरवलं नाहीये, मला पुढचं

शिक्षण घ्यावंसं वाटतंय." टिनाचं परिक्षण संपलं. पुढच्या तीन जणांचे इन्टेर्वीयु झाले. मग बाहेर आल्यावर सगळयांची चर्चा सुरु झाली. टिनाच्या मैत्रिणीने विचारलं," तू पुढच्या २ वर्षात काय करणार म्हणून सांगितलं?" टिनाने तिचे उत्तर सांगितले. अजून एका मुलाने पण तेच उत्तर दिले होते. टिनाची मैत्रीण म्हणाली, "अरे हे उत्तर नव्हत द्यायचं! जर कंपनीला वाटलं की तुम्हाला शिक्षण संपल्यावर त्यांच्याबरोबर काम करण्याची इच्छा नाही, तर ते तुम्हाला घेत नाहीत."

झालं! एक चांगली संधी गमावली. त्यातील काही मुले इंटरव्ह्युमध्ये उत्तीर्ण झाली. टिनाने घरी येऊन सगळी हकीकत आईला आणि शेजारणीला सांगितली. शेजारणीच्या ओळखीने टिनाने अजून एका ठिकाणी जाऊन पाहिलं की काम मिळेल का, पण त्या माणसाने सांगितलं की आमचं काम फारच कठीण आणि उच्च स्तराचं असल्यामुळे तुझ्यासारख्या अनुभव नसलेल्या मुलीला इतकं कठीण काम करण्याआधी पाया मजबूत करायला हवा. शेवटी टिनाच्या आईच्या मैत्रिणीच्या ओळखीने एका छोट्याशा कंपनीच्या कार्यशाळेत काम करण्याची संधी मिळाली.

टीनाचा कामाचा पहिला दिवस उजाडला. टीना खूप उत्साहात तयार झाली. फटफटी घेऊन दिलेल्या पत्त्यावर जायला निघाली. सकाळी रस्त्यावर खूपच गर्दी होती. टीना हॉर्न वाजवत वाजवत पाऊण तासाने कार्यशाळेकडे जायच्या फाटकापशी पोचली. एक खडबडीत कच्चा रस्ता फाटकापासून आत जात होता. अनेक कंपन्यांच्या कार्यशाळा रस्त्याने जाताना दिसत होत्या. शेवटी एका छोट्या गल्लीत एक दोन मजली इमारत दिसली. शेजारीच गाडी ठेवायला जागा होती. टिनाला इमारत बघून थोडासा धक्काच बसला. टिनाला मनोमन आधीच्या कंपनीचे भव्य ऑफिस आठवले आणि ती थोडीशी हिरमुसली.

टीना आत गेली. खाली बॉक्स आणि अन्य बरंच पॅकिंगचं सामान पडलेलं होतं. काही माणसं टिनाकडे कुतूहलाने बघत होती. एक लोखंडी जिना वरच्या मजल्यापर्यंत जात होता. वरून आवाज आला, “वर ये”. वर गेल्यावर उजव्या बाजूच्या एका छोट्या खोलीत एक बाई आणि बऱ्याच मुली काम करत बसल्या होत्या. आत अजून एक खोली होती. तिथेसुद्धा काही बायका काम करत होत्या. प्रमुख बाईंनी टिनाला बोलावलं. सगळ्या मुलींशी ओळख करून दिल्यावर म्हणाल्या, “इथे रोज नऊ ते सहा बसावं लागेल.

तुला ही मीना शिकवेल आणि सांगेल ते कर.” नऊ ते सहा, रोज! बापरे फारच कडक दिसतायत! टिनाने मान डोलावली.

मीनाने तिला खालच्या मजल्यावर नेले. कंपनीचं मुख्य काम एम्बेडेड प्रणाली बनवण्याचं होत. मीनाने तिला संपूर्ण प्रणाली नीट समजावून सांगितली. टिनाचा निरुत्साह दूर झाला आणि तिला नवीन प्रणाली शिकण्यात रस वाटू लागला. मग टिनाला आतल्या बायकांकडे सुपूर्द करण्यात आले. त्या सगळ्या प्रणालीच्या विविध भागांचं सोल्डरिंग करत होत्या. टिनाला वाटलं हे सोल्डरिंगच काम तर मला सहज जमेल. एका बाईने तिला एक वायरींचा गठ्ठा आणून दिला आणि कृती दाखवली. टिनाने भराभर सगळ्या सोल्डर करून ठेवल्या आणि त्या बाईला जाऊन सांगितलं, “माझं झालं”. बाईने येऊन तपासणी केली. “हे काय करून ठेवलंय, किती अव्यवस्थित काम केलंस, ह्या जर अशा अवस्थेत दिल्या तर मशीन दोन दिवससुद्धा टिकणार नाही, पुन्हा कर सगळ्या”. टीना हिरमुसली. पण काही इलाजच नव्हता. तिच्या आधी लक्षातच आलं नाही की ह्या वायरींचा इतका परिणाम होईल मशीनवर. तिने आता मन लावून कामगिरी करायची ठरवली. खूप वेळ देऊन पुन्हा सगळ्या नीट केल्या. बाई आल्या तपासायला. “वा! जमलं की तुला!”

टीनाला काम कसं करायचं हे लक्षात येत होतं. सुरुवातीला कोणी बोललं की तिची थोडी मनातून चिडचिड व्हायची पण तीसुद्धा गेली. ज्या प्रमुख बाई होत्या त्यांनी टिनाला प्रत्येक मुलीबरोबर एक आठवडा काम करण्याची संधी दिली. काही मुली टीनाशी खूप गप्पा मारायच्या, काही अबोल होत्या. टीना आपल्या कामात लक्ष देत असे. एक प्रणाली बनवण्याकरिता किती चाचण्या कराव्या लागतात, प्रत्येक भाग किती बारकाईने तपासावा लागतो. त्याच्या पॅकिंगसाठी, दुरुस्तीसाठी माणसं नेमावी लागतात, ती प्रणाली किती दिवस टिकेल हे ग्राहकाला पुराव्यांसकट द्यावे लागते. प्रणाली नवीन संशोधन, नवीन पद्धतीने कशी बनवता येईल हे पाहावे लागते. आणि सगळ्यात महत्वाचे, ते म्हणजे ग्राहक शोधावे लागतात! एका छोट्याशा इमारतीत एवढा मोठा कारभार, एवढी माणसं काम करत असतील हे तर तिला स्वप्नातही वाटलं नव्हतं.

पावसाळा आला, मातीच्या रस्त्यावर आणखीनच खड्डे तयार झाले. पण ती उत्साहात कामावर जात होती. मुलींबरोबर जेवायला जात असे. त्या बऱ्याच भाषांमधील मालिकांबद्दल

बोलत असत. टीनाला वाटे ह्या कुठल्या मालिका शोधल्यात. काही मुली परीक्षांची तयारी करत होत्या, काही कामात वृद्धी व्हायला शिक्षण घेत होत्या. टिनाला नवीन गोष्टी कळत होत्या. वरच्या एका खणात दिवसभर रेडिओ मिरची लावलेला असे. इतकी कलकल! पण त्याचीसुद्धा सवय झाली. प्रत्येकीची ध्येयं वेगवेगळी होती त्याबद्दल चर्चा होत असे ती पण टिनाला ऐकायला मिळे. टीनाची फटफटीसुद्धा डिमांडमध्ये असे. बऱ्याचवेळा ती कोणाला कोणाला घरी सोडायची.

आता तिने पण नवीन नवीन विषयांवरील मालिका बघायला सुरुवात केली होती. वेगळ्या वेगळ्या कोर्सची चौकशी, पुढे काय काम करावं ह्याबद्दल विचार सुरु केला होता. एखादी कंपनी चालवणं काही सोपी गोष्ट नाही. कंपनीच्या रस्त्यावर वेगवेगळी खाण्यापिण्याची ठिकाणी हुडकली होती, तिथून घरी रोज काहीतरी चाऊम्याऊ खायला नेलं जायचं.

शेवटचा आठवडा आला. एक दिवस ती काम करत होती तेव्हा तिच्या पायावर गुदगुल्या झाल्या. तिने खाली पाहिलं तर उंदीर! ईई! शेजारी बसलेली मुलगी म्हणे “अगं इथे बरेच आहेत,

काळजी नको करू काही करत नाहीत ते". तेव्हा मात्र तिला तिचा शेवटचा आठवडा असल्याचा आनंद झाला. टिनाने सगळ्यांना शेवटच्या दिवशी खाऊ नेला. आणि प्रमुख बाईंनी तिने केलेल्या कामाचं प्रमाणपत्रसुद्धा दिलं.

कॉलेजचा दिवस उजाडला. टिनाला तिची मैत्रीण भेटली. टिनाला मैत्रिणीने विचारलं, "कशी झाली ग इंटर्नशीप?" टीना म्हणाली, "बरी झाली, खूप वेळ लागला ग मिळायला, तुझी?" मैत्रीण म्हणाली, "काही नाही ग उगाच ह्या इंटर्नशिप प्रकाराचं स्तोम माजवलंय, एवढा मोठा इंटरव्यू घेतला कशाला जर नुसती प्रेसेंटेशन बनवायला लावायची होती. आणि नोकरी देऊ असंसुद्धा काही बोलले नाहीत."

टिनाने मनात स्मित केलं. आता तिला तिच्या इंटर्नशिपचं महत्व लक्षात आलं होतं. सुरुवात छोटी असली तरी मिळालेला धडा मोठा होता.

# संस्कृति

“काय करणार बाबा, आता काही गोष्टी सोडून द्याव्या लागतात! आपण आहोत तो पर्यंत आपण करायचे!” सयाजीराव सांगत होते. मला त्यांचे बोलणे कळत होते पण वळत नव्हते. मनातून आश्चर्य वाटत होते. सयाजी राव तसे सुधारक आणि आपल्या कष्टात मग्न असणारे! घरात त्यांना मी कधी उपास करताना पाहिले नाही की पूजा अर्चा व्रत करताना पहिले नाही! पण वर्षातून एक नियम त्यांचा कधी चुकला नाही! तो म्हणजे पंढरीच्या वाटेवर असलेल्या तुकाराम महाराजांच्या पालखी बरोबरच्या वारकऱ्यांना जेवण वाढण्याचा! रात्रीपूर्ती पालखी मुक्कामाला येणार असली की सयाजी राव आठ दिवस आधी पुढाकार घेत. सर्व शिधा आणून आपल्या पत्नी आणि शेजारी कुटुंबिय मंडळींच्या सहभागाने जेवण बनवून ते पालखीच्या मुक्कामी पोचवून तेथे पंगत वाढून झाल्यानंतरच त्यांना स्वस्थता लाभत असे!

अशा या प्रसंगी त्यांचा मुलगा दोन दिवस दारूपार्टी करायला मित्रमंडळी बरोबर गेलाय आणि तो या त्यांच्या उपक्रमात त्यांना

कधीच मदत करत नाही हे मला अनपेक्षित आणि आश्चर्य कारक होते.

“पण सयाजी राव अहो हा थोडा विश्वासाचाही प्रश्न आहे.” मी म्हणालो.

“अरे बाबा, अशा प्रसंगात तुमचा विश्वास कुठे आहे यापेक्षा समाजात वेगवेगळ्या स्तरातील चार माणसं एकत्र येवून शांतपणे काही चांगलं करतात त्याच कौतुक आणि त्याला मदत हा भाग असू शकत नाही काय? आपण या संस्कृति आणि समाजाचा भाग आहोत आणि या सर्व गोष्टींचा आनंद घेण्याची वृत्ती किंवा या गोष्टीबद्दल काही जवळीक वाटणे तर दूरच पण सर्वच भारतीय संस्कृति आणि जीवन पद्धतीस पूर्णच निरर्थक समजणे हे काय चांगले लक्षण आहे? सुधारणेला वाव कायमच असतो पण हे घरच निरूपयोगी आहे हा भाव मला फार अस्वस्थ करून जातो! ” सयाजी रावांनी मनातील मळमळ माझ्यासमोर मोकळेपणी मांडली.

“अहो, तरुण रक्त आहे जरा बंडखोर वृत्ती, काही वेगळ्या वाटा शोधण्याची वृत्ती असते!” मी म्हणालो.

“अरे त्याचा जरा पाश्चात्य गोष्टींकडे जास्त ओढा आहे ते काही प्रमाणात अपेक्षित आहे. संगीत असो की खाणे पिणे असो की रहाणीमान असो! आणि माझी काही तक्रार नाही! पण सगळ्याच मराठी गोष्टी कमी दर्जाच्या किंवा निरर्थक आहेत असा भाव त्याच्या वागण्या बोलण्यातून डोकावला की जरा खंत वाटते!” सयाजी राव सांगत होते.

“तू काहीही म्हण, पण.... आहे त्या घरात सुधारणा करू असे म्हणणे आणि सगळे घर निरूपयोगी आहे असे म्हणणे या दोन दृष्टिकोनात अंतर आहे” सयाजी राव पुढे म्हणाले.

“तुमची काळजी मला कळते, पण आता या बाजारी आणि जाहिरात बाज औद्योगिक जगात आपली स्वत:ची नाळ शोधण्यातच आधी शहरी लोकांची वर्षानुवर्षे जातात! त्याला काय करणार!” मी म्हणालो

सयाजी रावांशी भरपूर गप्पा मारून मी निघालो तेंव्हा रात्रीचे 8 वाजले होते. मुंबईला जाणाऱ्या मिळेल त्या ट्रेनमध्ये शिरलो आणि तेंव्हा गर्दी कमी असल्याने जरा बाकावर निवांत पसरलो.

तेवढ्यात एक तरुण समोर येउन बसला. साधे सुरवार आणि झब्बा अशी भारतीय वेषभूषा, कोरलेली दाढी असा साधाच

दिसणारा माणूस होता. कपाळ मात्र मोठे होते. थोड्या वेळाने एक अजून व्यक्ति त्याच्या शेजारी येऊन बसली निदान भारतात सगळ्यांचे लक्ष जावे अशी ती व्यक्ति होती. कारण साधी जीन पॅन्ट आणि टी शर्ट आणि पायात कॅनवस शूज असलेला तो माणूस गौरवर्णीय होता. अमेरिकन किंवा युरोपियन असावा. मी आपला वेळ घालवायला माझ्या मोबाइल वर गाणी लावली.

"गगन की और निसांना हे, दाहिने सुर चंद्रमा बाहे, तीनके बीच छिपाना हे...' प्रभा अत्रे कबीर भजन हिंदोस्तानी क्लासिकल ढंगात गात होत्या. ते संपल्यावर कुमार गंधर्वांचा आवेगी सुर घुमला. "शून्य गढ शहर.." गोरखनाथांचे भजन!

समोरचा कोरलेली दाढी ठेवलेला तरुण मन लावून ऐकत होता. न राहवून मला तो म्हणला." तुमच्याकडे असलेली ही क्लिप मला द्याल काय? मी गायक आहे, आमच्या घरात हिंदुस्तानी संगीताचा वारसा आहे. हे जे शब्द आणि गायकी आहे त्याने त्या भजनांचा भाव आणि अर्थ श्रोत्यांपर्यंत पोचतो छान!"

"म्हणजे बघा ध्यान करण्यातील बारिकाई कबीर कसे सांगून जातात दोन ओळीत! जसे ते भजन आहे बघा भीमसेनजी गातात,

गिळून सांडले कलेवर भव भ्रमाचा आकार! दोन ओळीत सर्व माया कशी पार केली ते सांगून टाकले आहे” तो तरुण पुढे म्हणाला.

“वा, म्हणजे तत्त्वज्ञानाचा अभ्यासही दिसतोय तुझा!” मी आश्चर्याने म्हटले.

“तस काही नाही हो, गायकाला गाणे समजून म्हणावे लागते, त्याशिवाय मजा नाही”

“खरे आहे!” मी म्हटले. मी त्या तरुणाला गाणी पास केली, त्याच्या मोबईल ला. त्यानेही मग त्याने गायलेले काही राग, ठुमऱ्या, भजने मला दिली. झलक ऐकून गडी तयारीचा वाटत होता. मी मग म्हटले “अरे तू एवढा गायक आहेस तर मला तुझे नाव पत्ता देवून ठेव, कधी आमच्या सोसायटीमध्ये गरज वाटली तर तुला नक्की बोलावता येईल!” जुन्या मुंबईचा रहिवासी होता तो!

शेजारी बसलेला गोरा हे सर्व ऐकत होता. अचानक तो पुढे सरकला आणि मला म्हणाला. “एवढे तुम्ही भारतीय संगीत आवडीने ऐकता म्हणून विचारतोय, तुमच्याकडे खास पारंपरिक पद्धतीने वारकऱ्यानी गायलेला हरि पाठ आहे काय? चिपळ्या आणि ढोलके वापरून गायलेला!”

मी गार पडलो क्षणभर, कारण हे महाशय अस्खलित मराठीमध्ये माझ्याशी बोलत होते!

“तसे सातारकर महाराजांचे रेकॉर्डिंग आहे माझ्याकडे, पण ते काय तुम्हाला यू ट्यूब वर ही मिळेल! मी काही तसा कधी वारी ला वगैरे गेलो नाही किंवा पालखी आली तरी फार वेळ वारकऱ्यांबरोबर घालवलेला नाही कधी! तुम्हाला अस्सल गळयात माळ घातलेला वारकरी शोधायला हवा त्यासाठी!” मी हसून म्हणालो.

“माफ करा पण विचारल्या शिवाय राहवत नाही, तुम्ही एवढे अस्खलित मराठी कसे काय बोलायला शिकलात?” मी आश्चर्याने विचारले.

“मी पीएचडी करतोय ‘मराठी संत परंपरा तत्त्वज्ञान आणि चाली रीती ‘ या विषयांवर!” त्याने हसून सांगीतले.

“ओके, अस होय, ऐकून छान वाटलं! तुम्हाला इतर काही माहिती हवी असेल तर सांगा”

“नाही, तसे मी येथील यूनिवर्सिटी मधील तज्ञांच्या संपर्कात आहे. पण जरा बाहेरच्या जगातून माहिती गोळा करण्याचा प्रयत्न! पुढच्या वर्षी पंढरीची वारी करायचा प्लान करतोय!” त्याने उत्तर दिले.

नंतर घाटातील वाऱ्यात मी जरा डुलकी घेतोय तो मुंबईच्या खाडीचा आणि प्रदूषणाचा विशिष्ट वास आला आणि मला मुंबई जवळ आल्याचे कळले!

दादर ला उतरून मी माझ्या लोकल ट्रेनमध्ये बसलो तो का कुणास ठाऊक, पण मी समाधानी होतो. सयाजी राव त्यांच्या मुलाच्या बांधीलकीची काळजी करत असले तरी मला भारतीय संस्कृतिच्या भविष्याची काळजी त्या क्षणी वाटत नव्हती.

# मनोरंजनाचे नवे मार्ग

अन्न, पाणी आणि घर या माणसाच्या मुख्य गरजांबरोबर मोबाइल आणि वाहन यासुद्धा आता सामान्य माणसाच्या गरजेच्या वस्तु झालेल्या आहेत. त्यांच्या अभावात अनेक लोकांना हरवल्यासारख होतं. मी तर एका परराष्ट्रात शिक्षण घेणारी मुलगी. मोबाइल तर लगेच नवीन विकत घेतला पण वाहन घेणं तितकं सोपं नाही. आणि त्यात कार घ्यायची म्हणजे इथल्या नियमांची आधी माहिती करून घ्यायला हवी आणि परवाना पण हवा. भारतात रिक्षा आणि बस च प्रस्थ आहे, इथे तसं काही उपलद्ध नाही, बस असली तरी पाहिजे ती बस मिळणं फारच दुर्मिळ. अशा परिस्थितीत उबर् मुळे माझ्या बरोबरच अनेक विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला.

पहिल्यांदा उबर वापरायचं ठरवल तर कॉलेजला उशीर झाला म्हणून. जरासं भीतच मागवली, ड्रायवर मी उभी होते तिथे बरोबर आला, मॅप वर मला तो कुठपर्यंत आला ते सर्व काही दिसत होतं. नीट गाडीचा नंबर निरखून पहिला आणि निमूटपणे गाडीत जाऊन बसले. हे सगळं माझ्यासाठी खूप नवीन होतं.

सुरुवातीला खूप गडबड व्हायची. ड्रायवर एकीकडे आणि मी एकीकडे. गरगर फिरून त्याला गाठायच, जर शोधायला वेळ लागला तर तो तणतण करणार. ड्रायवरशी इंग्रजीमध्ये बोलायला देखील संकोच वाटायचा, आणि जर शेअर राइड असेल तर इतर सहप्रवाश्यांशी मी काहीच संवाद करायची नाही.

मग हळूहळू जशी सवय झाली तसं उबर् मागवणे मी सहजपणे करू लागले. कॉलेज ला जाणे, नोकरी शोधण्यासाठी वेगवेगळीकडे करियर फेअर ला जाणे आणि नुसतं मैत्रिणींना भेटायला जाणे, सगळयांसाठी उबर.

उबरच्या द्वारे वेगवेगळया कार्समध्ये बसायला मिळायचे. त्याची मजा वाटू लागली. उबर मुळे माझ्या दिशा ज्ञानात तर खूपच उन्नती झाली. आता मी ड्रायवर तसंच सहप्रवासी यांच्याशी गप्पा मारायला सुरू केल्या. इंग्रजीमध्ये सहज पणे बोलण्याची मला चांगलीच सवय झाली आणि त्यांच्याशी गप्पा मारणे हा एक छंद झाला.

उबर् द्वारे इतके विविध लोक भेटले याच अनेकदा आश्चर्य वाटतं. इथे अनेक वर्ष राहणारे बरेच लोक भेटले, आणि त्यांनी ५० - ६० वर्षांपूर्वी इथे काय परिस्थिती होती याचं हुबेहूब वर्णन मला सांगितलं. एका उबर् चालकाने तर इथे असलेल्या संत्री, सफरचंद आणि इतर फळांच्या बागेचे वर्णन हुबेहूब सांगितले. इथलं भव्य विमानतळ एके काळी फक्त एक छोटीशी इमारत होती यावर माझा विश्वासच बसेना. तो चालवणारा स्वतः एक विमान चालक होता. कोळश्याच्या खाणी असलेलं हे ठिकाण ५० वर्षात कसं इतक सुरेख बनवलं याचीसुद्धा गोष्ट सांगितली.

इथले स्थाईक लोक, त्यांच्या सवयी, त्यांच्या खाण्या-पिण्याच्या सवयी आणि त्यांच्या अडचणी यांची उत्तम माहिती या ड्रायवर आणि सहप्रवाश्यांशी बोलून कळायची. इथल्या बॅले आणि इतर गायन नृत्याच्या प्रकारांबद्दल सांगितले. मी स्वतःसुद्धा नंतर ते उत्कृष्ट नृत्य बघून आले. एक महिला ड्रायवर तर एका छोट्याश्या गावातून येऊन इथे स्थाईक झालेली होती, आणि तिने तिच्या गावाच्या आसपास असलेल्या प्रेक्षणीय स्थलांबद्दल माहिती दिली.

सॅन दिएगो नावाच्या शहरात गेलेले असताना तिथे उबेर आल्यानंतर वाटेतच माझ्या मोबाइलमध्ये घोटाळा झाला आणि राईड बंद पडली. पण ड्रायवर खूप चांगला निघाला. त्याने विनामूल्य हॉटेल वर पोचवलं, तेवढंच नाही तर जेव्हा मी सांगितलं की मी पर्यटनासाठी आले, तेव्हा शहराची टूर देऊन कुठली ठिकाणं फिरावी याबद्दल माहिती सांगितली. सॅन दिएगो येथे नौदलाचं खूप मोठं काम चालतं. तो स्वतः कदाचित नौदलात काम केलेला असावा आणि त्याने नौदल जहाजाला भेट देण्यास सांगितले. त्यामुळे पहिल्यांदा मी एक प्रचंड विमानवाहू नौदल जहाज आतून बघितले.

अनेक क्षेत्रात काम करणारे लोक उबरच्या माध्यमातून भेटायचे. एका माणसाची जहाजांचा विमा बनवणारी कंपनी होती आणि त्यात तो मला नोकरी द्यायलासुद्धा तयार होता! काही कॉलेज मधील पोरंसुद्धा फी भरायला हातभार लागावा म्हणून उबर् चालवतात आणि त्यांची मला दाद द्यावीशी वाटायची. काही पोरं विमानतळावर सामान हलवणे वगरे अशी छोटी मोठी कामं करणारी होती. त्यांच्याकडून मला इथल्या शाळा कॉलेजच्या गमती कळल्या. काहींचे स्वतःचे धंदे होते त्याचं मार्केटिंग करायचे.

त्यांची रेस्टॉरंट होती तिथे येऊन जेवायचा आग्रह धरायचे. एका पंजाबी माणसाने तर त्याच्या रेडियो स्टेशन वर येऊन एखादा मराठी कार्यक्रम करण्याचा आग्रहच धरला. त्यापूर्वी एक तास मी एकटी कार्यक्रम करू शकीन असा विचार देखील मनात आला नव्हता. पण त्या माणसाने मला इतक्या उत्तम रीतीने समजावले, आणि माझ्या मराठी भाषेची जबरदस्त तारीफ केली की मला खरंच क्षणभर त्याच्या रेडियो वर जावस वाटलं!

अनेक महिला ड्रायव्हर भेटल्या. एका बाईकडे विविध पर्फ्यूम होते आणि तिने त्यांचा सुवास दिला. दुसरी एक नुकताच जॉब सोडून बसली होती आणि तिला हा पैसे कमवायचा उत्तम मार्ग वाटत होता. काहींच्या पारीवरिक अडचणीमुळे ते ड्रायव्हर बनले होते. अनेक देशांचे लोक भेटले. एका रशियाच्या बाईने त्या भाषेतील मधुर गाणी लावून ठेवली होती. काही एशिया मधील अन्य देशांचे लोक भेटले, चीन, व्हिएतनाम वगरे आणि त्यांनी त्यांच्या देशातील जीवनापद्धतीबद्दल सांगितले. भारत आणि त्यांच्यातील साम्य आणि फरक यावर चर्चा केली.

काही विरोधी मतांचेसुद्धा लोक भेटले. एका मुलाने तर कॉलेज ला जाणे कसे अनावश्यक आहे हे समजावण्याचा मला प्रयत्न केला. दुसऱ्या एकाने तर आरव्हीमध्ये म्हणजे गाडीत राहणे किती स्वस्त चांगले आहे आणि भारतातील कमी उत्पन्न असलेले लोक हा मार्ग का अवलंबत नाहीत यावर तर्क केलं. मी तेव्हा आरव्हीच्या अडचणीबद्दल आणि भारतात कमी उत्पन्नामध्येसुद्धा आनंदात राहू शकता ह्या वाद्विवादात पडले नाही आणि फक्त त्याचं म्हणणं ऐकून घेतलं. विविध स्तरातील विविध परिस्थितीत लोक या उबरकडे जीवन निर्वाह करण्यासाठी वळले होते. त्यांच्या गोष्टी ऐकून मजा वाटायची.

नंतर नोकरी लागली तेव्हा मी अनेक कंपनी मधील लोकांबरोबर कारपूल म्हणजे त्यांच्या गाडीतून एकत्र प्रवास सुरू केला आणि मला अशीच वेगवेगळी लोक भेटत राहिली. उबर् ड्रायव्हरस्पेक्षा सुशिक्षित आणि बहुश्रुत त्यामुळे त्यांचे अनुभव वेगळे. आता स्वतःची कार असली तरी मधूनमधून मी कारपूल करते. एका मोठ्या कंपनीमध्ये काम करणाऱ्या बाईने तर मला सांगितले की ती फक्त विविध लोकांना भेटण्यासाठी हा कारपूल चा उपक्रम करते.

भारतात गेल की सगळे आपापल्या गाड्या काढून नोकरीला जातात. बस किंवा लोकलमध्ये कानात हेडफोन घालून गाणी ऐकत बसलेली असतात. त्यांना मला सांगावस वाटतं की एकदा तुमच्या कानातील यंत्र काढून बघा, तुमच्या किंवा इतर कंपनीतील लोकांबरोबर एकत्र कारपुल करा आणि गप्पा मारा, आणि मग बघा की तुमचं किती जास्त मनोरंजन होईल ते!

# दांडेलीची सहल

आजच्या शहरांमधील जीवनशैली इतकी धकाधकीची झालीये की माणसं कधी एकदा शहर सोडून दूर एखाद्या रम्य अशा गावात जाऊन काही दिवस घालवतील याची वाट बघत असतात. मी पुण्यातील एका अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेणारी मुलगी. पुणे हे माझं आवडतं शहर अशा करिता आहे की इथे शहरातील सुख सोई पण अनुभवायला मिळतात आणि हिरवी गार झाडे, निसर्ग सौन्दर्यसुद्धा आहे. पुण्यात तुम्ही अनेक वर्षांचे रहिवासी असाल तर सूर्यपक्षी, दयाळ किंवा कधीतरी मोर देखील तुमच्या नजरेस पडले असतील मुळशीकडे किंवा इतर दिशेला फिरायला गेल्यावर. पुण्याच्या परिसरातील चिंच, वड, निलगिरीच्या झाडांमध्ये ही मंडळी घरटी करून दडून बसलेली असतात. तुम्ही डोळसपणे पुण्यात फिरलात तर हे पक्षी तुम्हाला नक्की नजरेस पडले असतील.

पुण्यात राहण्याचा हा फायदा मला खूप झाला. सिंहागडपासून पाषाण तळ्यापाशी आणि आणखी अनेक ठिकाणी पक्षी निरीक्षण केल्यावर आमच्या पक्षी निरीक्षणात रस वाटू लागला. त्यांनंतर

आम्ही भरतपूर नावाच्या अभयारण्यात गेलो आणि अधिकच गोडी लागली. या वर्षी, आम्ही दांडेली नावाच्या ठिकाणी सहल न्यायचे ठरवले.

आम्ही म्हणजे मी, माझा परिवार आणि शेजार पाजारचे उत्साही लोक. आम्ही चौदा जण दोन माहीतगारांना घेऊन बसचा प्रवास सुरू केला. दांडेली हे गांव बेळगाव पासून अगदी नजीक. त्यामुळे रात्रीचा प्रवास केल्यावर सकाळी नाष्ट्याच्या वेळेला बेळगाव आलं. बेळगावला नाष्टा खूप चविष्ट, गरम इडली वडा सांबार आणि विविध चटण्या. त्याबरोबर गोड शिरा आणि कस्टर्ड.

पेट पूजा झाल्यावर सगळयांची झोप पळाली आणि प्रवास आता खुद्द दांडेलीच्या दिशेने सुरू झाला. दांडेलीच्या पानझडी वनाशी इथे पहिली ओळख झाली. रस्त्याच्या एका बाजूला सुपा धरणाचे स्वच्छ पाणी पसरले होते.

आमच्या बरोबरच्या जाणकार दादाने गाडी थांबवली आणि अनेक पक्षी दुर्बिणीतून टिपले. आकाशात दूरवर एक घार दिसत होती. पाण्यावर रिवरटन नावाचे पांढरे पक्षी उडताना दिसत होते. पाण्यात एका पायावर उभं राहून बगळे मासे शोधत होते. झाडांच्या

गर्द सावलीत लाल हिरव्या रंगांचे सूर्यपक्षी सूर्यप्रकाशात चमकताना दिसत होते. ढोकरी नावाचा पक्षी नदी काठी उभा राहून सगळं काही न्याहाळत होता.

अचानक दोन उंच झाडातून दोन मोठे पक्षी उडाले. पटकन दुर्बिण लावली तर ते धनेश पक्षी निघाले. या धनेश पक्ष्यासाठी दांडेलीचं वन प्रसिद्ध आहे. आणि त्याची झलक पहिल्या दिवशीच मिळाली. चास नावाचा पक्षी तसंच कोतवाल वर टांगलेल्या वायर वर बसून जणू आमची वाट पाहत होते.

दांडेली ला पोचताच चविष्ट असा मराठमोळा बेत आमच्यासाठी तयार होता. भाकरी बरोबर भरली वांगी, उसळ, भात आणि शेवटाला फ्रूट सॅलड. काली नदीच्या तीरावर वसवलेलं हे छोटसं पर्यटकांसाठी बांधलेले ठिकाण. तिथे निवांत वेळ घालवायला खूप मजा आली. मोठेमोठ्या वृक्षांनी आम्हाला घेरलं होतं. त्यातील एका वृक्षावर चढून बासलेलं असताना आमचा दादा जोरात ओरडत आला. काहीतरी नदीच्या दुसऱ्या तीरावर दाखवायचा प्रयत्न करत होता. पहिल्यांदा तो एक भला मोठा दगड वाटला, पण नीट बघितल्यावर कळलं की ती तर उन्हात पाहुडलेली मगर होती! दादाने चला मुलांनो असा आदेश देऊन आम्हाला थेट जंगलात नेलं. तिथे नीलगाय दिसली, छोटी कासव पाण्यात

तरंगताना दिसली, प्रचंड आकाराच्या खारुताई दिसल्या. काहींना अस्वल आणि ठिपक्यांच हरीणसुद्धा दिसलं. संध्याकाळ पर्यंत अशा रीतीने वेळ घालवला आणि मग आमच्या राहण्याच्या ठिकाणी परतलो. अंधार केव्हाच झाला होता आणि थंडी पडली होती, मस्त उबदार शेकोटी पेटवून दादाच्या आणि मित्रमंडळींच्या गोष्टी ऐकण्यात कसा वेळ गेला कळलच नाही.

दुसऱ्या दिवशी पहाटे लवकर उठून मंडळी परत जंगलात जायला तयार! आजच्या दिवशी आम्ही धनेश पक्षी बघायला जाणार होतो. वन अधिकारी आम्हाला वनाचा आरंभ होत होता तिथे घेऊन गेले. सागाचे झाडांचे अजस्त्र ओंडके पडलेले दिसत होते. धनेश पक्षी हा कसा आपला जीवन साथी निवडतो, झाडाच्या ढोलीत घरटे करून पिलं वाढवतो हे प्रत्यक्ष डोळ्याने बघायला मिळाले.

धनेश पक्ष्यांचे थवे बघितल्यावर आम्ही नदीवर राफटिंग करायला गेलो. होडीत बसून नदीच्या खळखळत्या पाण्यातून वाहत जाताना सगळे रोमांचित झाले. नदीच्या दोन्ही बाजूला घनदाट झाडी होती आणि त्या गर्द झाडीत कितीतरी प्राणी लपून

आमच्याकडे बघत असावे. दमून भागून आलो आणि जेवण केलं. रात्री वनात जाण्याचा अनुभव घेण्यासाठी आम्ही पुन्हा अरण्यात प्रवेश केला. किर्र झाडीत चंद्रप्रकाशात कोल्हे ससे सरसर पळत होते, आणि कुठेतरी फक्त चमकणारे डोळे दिसत होते. डोळ्यात स्वतःच बोट गेलं तरी कळणार नाही इतका अंधार.

अजूनही आमचा वनाचा संपूर्ण भाग बघून झाला नव्हता. जंगलाचा काही भाग सदापर्णी वृक्षांचा होता. तिथे स्थलांतर करून भारतात येणारे अनेक पक्षी बघायला मिळाले. निळ्या रंगाचा नील मदाक्ष पक्षी, लाल रंगाचा स्वर्गीय नर्तक पक्षी तसेच श्यामा नावाचा अत्यंत गोड गळ्याचा पक्षी थुई थुई नाचत होता. हिमालयातील पक्षी, विविध रंगांचे पारवे बघायला मिळाले. इतके अनोखे रंग मनुष्य जातीला निर्माण करणं अशक्य!

संध्याकाळी पुन्हा पुण्याच्या दिशेने प्रवास सुरू झाला. निसर्गाने नेटलेले हे ठिकाण मात्र डोळ्यासामोरून जात नव्हते. घरी आल्यावर मी माझे अनुभव लिहायचे ठरवले कारण माझी इच्छा होती की बऱ्याच लोकांनी हा आनंद घ्यावा.

# 'ग' ची बाधा

"तुला ह्या गोष्टींची समज यायला खूप वेळ लागेल! त्यासाठी कष्ट करावे लागतात! 15 - 15 वर्षे रात्रपाळी आणि दिवसा परत काम आणि शिक्षण असे सगळे काबाडकष्ट केले म्हणजे कळते." भास्कर राव सांगत होते. त्यांचा पुतण्या आणि धाकटा भाऊ समोर बसून ऐकता ऐकता बटाटे वड्यांवर ताव मारत होते. "बरं चहा घेणार की कॉफी?" शेवटी भास्कर रावांच्या पत्नीने त्यांचे प्रवचन थांबवण्यासाठी प्रश्न टाकला.

"मला बिन साखरेचा आणि बिन दुधाचा लागतो ते तुला माहिती आहे स्नेहल, मनोहर ला हल्ली काय चालते ते विचार?" भावाकडे बोट दाखवून भास्कर राव त्रासिक सुरात म्हणाले. त्यांचे प्रवचन थांबवण्यासाठी ही युक्ति पत्नीने केली आहे हे त्यांना मनातून कळले होते आणि त्यांना ते आवडले नव्हते.

साठी पलीकडे वय पोचलेले भास्कर राव हे नातेवाईक आणि आजूबाजूच्या सोसायटीमध्ये वजनदार आणि भारदस्त व्यक्तिमत्व म्हणून परिचित होते. त्यांच्याबद्दल समाजात आदराची भावना

होती. त्याचे कारण ही तसेच होते. बहुतेक परिचित वर्तुळात भास्कर रावांच्या गतायुष्याबद्दल साधारण बऱ्यापैकी माहिती होती. त्यांनी अनेक वर्षे केलेली रात्रपाळी, दिवसा केलेल्या पार्ट टाइम नोकऱ्या आणि हे सर्व आणि कुटुंब सांभाळून पूर्ण केलेले उच्चशिक्षण, त्यानंतर स्वतःचा वाढवलेला उद्योगधंदा ही सर्व कथा बहुतेक परिचित लोकाना माहीत होती. भास्कर रावांना या आपल्या कष्ट कर्तृत्व आणि यशाचा अभिमान होता. त्याबरोबर त्यांना असेही वाटत असे की आपण सर्व गोष्टीमध्ये नीट लक्ष घालून बारीक लक्ष ठेवून सल्ले दिले तर कुटुंबिय आणि नातेवाईक यांचे व्यवहार मार्गावर राहतील. कारण आपली जीवन अनुभवाची शिदोरी इतर कोणाकडे नाही असे त्यांचे मत होते. दुसरीकडे वयानुसार त्यांचा स्वभाव जरा काळजी करणारा आणि शिस्तशिर झाला होता. त्यामुळे मुलगा सुधीर मोठा झाला. त्याचे सर्व शिक्षण उत्तम झाले. तो व्यवसाय उद्योग उत्तम सांभाळू लागला तरी त्याला बारीक बारीक गोष्टीमध्ये आग्रही सल्ला द्यायला भास्करराव चुकत नसत!

पुतण्या आणि धाकटा भाऊ मनोहर त्यांचा निरोप घेऊन गेल्यावर भास्करराव शयन गृहाकडे निघाले तोच पत्नी म्हणाली,

“अहो आता मनोहर भावोजीचं काय हे वय आहे का तुमचे प्रवचन ऐकण्याचे!”

“मी माझ्या पुतण्या ला सांगत होतो!” भास्कर राव म्हणाले.

“हो, तो तुमचा लाडका पुतण्या आता मॅनेजर आहे चेन्नई ला! तोच 100 लोकाना प्रवचन देत असेल तिथे” पत्नी फणकाऱ्याने म्हणाली.

“अग आपल्या अनुभवाचा फायदा आपल्या कुटुंबियांना करून देणार नाही तर कुणाला देणार?” भास्कर राव म्हणाले.

“हा असा? ते काय तुम्हाला विचारायला आले होते का? तुमच्याबद्दल काही वाटत म्हणून सगळे तुम्हाला भेटायला येतात. तुमचे प्रवचन ऐकायला येत नाहीत ते!” पत्नीने उत्तर दिले. “तुम्ही जरा सकाळी बाहेर फिरून येत जा बघू! आता गेल्या वर्षापासून तसेही तुम्ही कंपनीमध्ये जाणे कमी केलयं!” पुढे तिने पुस्ती जोडली.

पत्नीच्या दिशेने उजवा हात झाडून भास्कर राव त्रासिक चेहऱ्याने झोपण्याच्या खोलीच्या दिशेने वळले.

सकाळी उठल्यावर त्यांनी ठरवून गाडी काढली आणि ते शहरातील मोठ्या पार्कच्या दिशेने निघाले. गाडी लावून ते पार्कच्या दिशेने चालत निघाले. घाई घाईने चालत असताना त्यांना जाणीव

झाली की खर म्हणजे घाई करण्याचे काहीच कारण नव्हते. मग ते निवांत चालत पार्कमध्ये शिरले. पार्कमधील धावण्याच्या पथावर दोन फेऱ्या मारल्यावर त्यांना बरे वाटले. सकाळच्या प्रसन्न हवेत हिरवीगार हिरवळ, फुलझाडे आणि वृक्षांच्या पालवीचे भरघोस हिरवे विस्तार बघून त्यांचे मन प्रसन्न झाले. निवांत चालत असताना त्यांना एक बाक दिसला. त्यावर ते टेकले आणि अवती-भोवतीच्या वातावरणाचा आस्वाद घेऊ लागले.

अशीच काही मिनिटे गेली आणि त्यांच्या कानावर आवाज आला. "मी येथे बसलो तर चालेल का?" त्यांनी मान वळवून पहिले तो एक त्यांच्याच वयाचा गृहस्थ त्यांची परवानगी मागत होता, बाकावर बसायला! "बसा, जरूर, पार्क सगळ्यांचाच आहे!" भास्करराव हसत म्हणाले. तो गृहस्थ बसला आणि त्यांना त्याचा चेहरा ओळखीचा वाटला. थोड्या क्षणात त्यांची ट्यूब पेटली.

"अरे तू यशवंता का? मी भास्कर, मला ओळखले का? आपण प्राथमिक शाळेत एकाच वर्गात होतो." भास्कर राव म्हणाले.

“अरे खरंच, माझ्या लक्षातच आले नाही.” यशवंत म्हणाला. “आता ‘साठी बुद्धी नाठी’ अस होत कधी कधी!” तो पुढे मिष्कील पणे म्हणाला.

“कसा आहेस यशवंता?” भास्कर रावांनी आस्थेने विचारपूस केली.

“मी झकास आहे! निवांत आयुष्य जगतो आणि मला हवे ते छंदसुद्धा जोपासतोय. तू कसा आहेस?” यशवंता म्हणाला.

मग दोघांच्या गप्पा रंगल्या. यशवंतांची कथा खरंच अद्भुत होती. मिलिटरीमध्ये जातो काय? पाकिस्तानात कैदी म्हणून काही महीने भयंकर परिस्थितीमध्ये राहिल्यानंतर नशीबाने ऑफिसर प्रीसनर एक्स्चेंजमध्ये सुटतो काय? मग मॅनेजमेंट करून गल्फमध्ये जावून प्रचंड यश मिळवून नंतर स्वत:ची कनसलटिंग काढतो काय! त्यातील अडचणी वर मात करून यश मिळवून मग सर्व व्यवसाय मुलीच्या नावावर करून स्वतः बाजूला काय होतो. आणि आता वर्षातून 4 महीने आदिवासी भागात मुलांना आणि तरुण मंडळी ना शिकवायला काय जातो.

“पैसा उभा करायला ही मदत करतो मी त्यांना!” यशवंता सांगत होता. “मला तशीही प्रवासाची आवड आहेच!” त्याने पुढे हसत सांगीतले!

“अरे पण घरात लोक कसे राहतात, जरा व्यवसायावर देखरेख करायलाही लागत असेल की? आपल्याला लक्ष ठेवावे लागतेच!” भास्कर राव म्हणाले.

“हे बघ भास्कर, एक वेळ अशी येते की तुला दिसत असतं की आपल्या सांसारिक जबाबदाऱ्या आता खूप कमी झाल्या. घरातील पोर आणि सगळी मंडळी स्थिर आणि स्वतंत्र झालीत. पण आपण ते दिसूनही मान्य करत नाही. आपण ‘अनुभव’, ‘सल्ले’, ‘मार्गदर्शन’ असे शब्द वापरतो! पण सत्य असे असते की आपल्या मनावर पडली असते एक बेडी!” यशवंत म्हणाला.

“कसली बेडी?” भास्कर राव आश्चर्याने म्हणाले

“आपल्या अहंकाराची आणि मायेची आणि अपेक्षांची बेडी!” यशवंत म्हणाला. “अरे ती तुला हळू हळू काढून फेकाविच लागते. ड्रायवर सीट सोडावी लागते. त्याशिवाय निष्काम आणि निरमोहि होत नाही मन आणि मनाला शांतता ही लाभत नाही. आता बास झाल यार, यशाच्या मागे धावणे! अरे जरा ‘आपल्याला आवडेल ते काम’ परिणामाची अथवा प्राप्ती ची गणिते मनात न

मांडता करून पाहा. बघ काय मजा आहे आयुष्यात! तुला सांगतो, आता आपल्या कुटुंबिय आणि नातेवाईक मंडळी या सर्वांबरोबर माझी छान संगत असते पण त्यात मी कुठेच गुंतलेला नसतो. मी पूर्ण शांत झालोय त्यामुळे''

"तू तर तत्त्वज्ञान बोलायला लागलास बाबा!" भास्कर राव म्हणाले.

"ते मला माहीत नाही, माझा दृष्टिकोन बदलला आणि काय झाले माहीत नाही पण माझे मन जास्त प्रसन्न राहायला लागले हे खरे!" यशवंत म्हणाला.

यशवंतला निरोप देवून आणि घरी येण्याचे आग्रही निमंत्रण देवून भास्कर राव घरी निघाले ते विचार मग्न होवून! त्यांच्यापेक्षा कठीण परिस्थिती ला तोंड देवून आपल्या आयुष्याची घडी बसवून मग त्या यशापासून मनाने पूर्ण बाजूला झालेला यशवंत त्यांना अंतर्मुख करून गेला होता. स्वतःबद्दल तो किती सहज आणि निरलस पणे बोलत होता!

घरी पोचले तो फोन वाजला. पलीकडून कंपनीचा माणूस बोलत होता. काहीतरी सल्ला, निर्णय हवा होता त्याला! भास्कर रावांनी शांतपणे त्याला सांगीतले, “जरा दोन सेकंद थांब बाबा, मी सुधीर ला सांगतो!” त्यांनी फोनचा रेसिवर बाजूला ठेवून पत्नीला सांगीतले. “जरा सुधीर ला फोन घ्यायला सांगशील का? कंपनीचा फोन आहे!” ते स्वतः बैठकीकडे वळले आणि टी वी बघण्यात मग्न झाले. त्यांची पत्नी आश्चर्याने त्यांच्याकडे बघत होती.

# नरेन्द्र आणि पाणीपुरी

“वा वा..!” नरेन्द्र प्रसन्न सुरात म्हणाला! आप्पा आपल्या पांढऱ्या काळया दाढी मिशीत हसले आणि त्यांनी भेळ अजून जोरात मिसळायला सुरवात केली! नरेन्द्रने पाणीपुरी संपवित भेळ कधी मिळेल असे बघायला सुरवात केली. नरेन्द्र आणि आप्पा यांचा स्नेह तसा गेल्या वर्ष भरातील! आधी सुरवात झाली ती म्हणजे पाणीपुरीने! नरेन्द्र सॉफ्टवेअर कंपनीत कामाला होता. संध्याकाळी कंपनीच्या बसमधुन उतरल्यावर समोरच्या गाडीवर मधूनमधून पाणीपुरी आणि भेळ खाणे हा त्याचा आवडीचा छंद होता. तसेही नरेन्द्र मुंबईत एकटाच राहत होता. रूमवर वाट बघायला कोण होते? आप्पांची गाडी आणि त्यांची चविष्ट पाणीपुरी म्हणजे नरेंद्राचा एक विरंगुळा झाला होता.

पण आप्पा शी रोज भेट व्हायला हल्ली जरा विशेष कारण घडले होते. सहा महिन्यांपूर्वी एकदा तो कामावरून लवकर आला तेंव्हा कंपनीच्या गाडीतून उतरल्या उतरल्या तो जागच्या जागी थबकला. समोरून एक मुलगी घाई घाईने त्याच्याच दिशेने येत होती. तसा नरेन्द्र पटकन मुलींकडे बघत वेळ घालवणाऱ्या

तरूणांपैकी नव्हता. त्यात करियर आणि कंपनीतील काम यात तो गेली दोन वर्षे एवढा गुंतला होता की त्याचे स्वतःच्या छंद आणि आवडी निवडी जपण्याकडेसुद्धा नीट लक्ष नव्हते. पण या समोरून येणाऱ्या मुलीत काही विशेष होते. सावळा रंग, नजरेत भरणारा डौलदार बांधा, घाईघाईत चालल्यामुळे खांद्यावर आणि पाठीवर हिंदकळणारा काळया पिंगट केसांचा बॉब, गोलसर चंहऱ्याची नाजुक जिवणी, अप्र नाक आणि प्रसन्न हसरी नजर! नरेन्द्र जागीच खिळला! ती त्याच्या जवळून पुढे गेली कोणाला हात करत आणि "हाय मधू" म्हणून तिने कोणाला तरी हाक मारली! तिच्या गालावरची खळी चटकन त्याच्या नजरेत भरली आणि तिच्या मंजुळ आवाजाची त्याच्या कानांनी नकळत नोंद घेतली! कुठल्यातरी फ्रेशनरचा गंध त्याच्या नाकाला अर्धा क्षण जाणवून गेला!

त्या क्षण भरात कसे कोणास ठाऊक पण नरेन्द्र ला ती मुलगी भावून गेली. नरेंद्राचे मन, सर्व इंद्रिये त्या सोंदर्यानुभवात बुडून तृप्त झाली होती. तो क्षण त्याच्या मनात ठाण मांडून बसला होता. रेडिओ, टी व्ही, मित्र, गप्पा, काम, घरी आई वडीलांना केले ले फोन, सिनेमा, कुठलेच दुसरे क्षण त्या क्षणाला त्याच्या मनातून

हलवू शकत नव्हते! तो क्षण त्याच्या मनाचा ताबा घेऊन बसला होता.

नरेन्द्रचे आयुष्य आता जरा बदलले होते. तो सकाळी मुद्दाम लवकर कामाला जात होता. लवकर कंपनीतून निघून त्या वेळेला तेथे येवून थांबत होता. दर्शन झाल्याशिवाय नरेन्द्र आता पुढे रूमकडे कूच करेनासा झाला होता! पण त्याला फार दिवस असे कष्ट करावे लागले नाहीत. त्याच्या कंपनीने त्याला एक वर्क शॉप करायला पाठवले आणि योगायोगाने ती मुलगी तेथे त्याच्या बरोबर आठ दिवस रोज त्याच क्लासमध्ये येत होती. मग नरेन्द्रने फार वेळ घालवला नाही. मैत्री करून घेतली. मंजुळा ची कंपनी त्याच्या कंपनीजवळ होती. त्यामुळे लंचमध्ये भेटीगाठी गप्पा सुरू झाल्या. मैत्री तर झाली पण आता पुढचा टप्पा मोठा अवघड होता. मंजुळाचे नाव कसे खास खेड्यातील पद्धतीचे आहे, अशी चेष्टा सहज करण्याइतकी त्याची आणि मंजुळाची आता मैत्री होती. पण प्रपोज करायचे म्हटले की नरेन्द्र कचरत होता.

त्या दिवशी नरेन्द्र आप्पांच्या गाडीसमोर येवून थांबला खरा पण त्याचे काही खाण्याकडे लक्ष नव्हते! “काय नरेन्द्र, लक्ष कुठे आज?” आप्पा त्याच्याकडे बघून हसले आणि त्यानी विचारले.

“काय सांगू आप्पा, मोठ्या अवघड परिस्थितीमध्ये सापडलोय!” नरेन्द्र म्हणाला.

“कारे? काय झालं?” आप्पा विचारते झाले.

“आप्पा, काय सांगायचं, म्हणजे तुम्हाला सांगायला हरकत नाही. तुमच्यापुरतंच ठेवा एक फ्रेंड आहे, आणि आमची छान मैत्री आहे. पण माझ्या मनात खरं सांगायच तर.. तिच्याबद्दल जरा वेगळ्या भावना आहेत. त्या कशा व्यक्त कराव्या अश्या पेचात आहे.” नरेन्द्र म्हणाला.

“अरे तुला तर काहीच प्रॉब्लेम यायला नको. तुम्ही हल्लीची मुलं काय, तुमच्या फ्रेंडशिप्स बऱ्याच मोकळ्या आणि पुढारलेल्या असतात. तुला मग ‘भावना व्यक्त करणे’ वगैरे नाजुक प्रश्न पडायचे कारणच नाही!” आप्पा खोचक पणे ‘पुढारलेल्या’ या शब्दावर जोर देत हसून म्हणाले.

“अस म्हणू नका आप्पा! मी तसा नाही” नरेन्द्र म्हणाला.

“तसा म्हणजे कसा?” आप्पा डोळे बारीक करून मिशीत हसत म्हणाले.

“आप्पा, मला कल्पना आहे हल्ली मुंबई पुण्यात फ्रेंडशिप असणे आणि ती अगदी सहज मोकळया शारीरिक जवळीकीपर्यंत नेणे हे प्रमाण बरेच आहे. अमेरिकन संस्कृतिबद्दल सिनेमे आणि म्युझिक वेडीओ बघून झालेले गैरसमज याला कारणीभूत आहेत असे माझे मत आहे. सारखी प्रसार माध्यमं नको त्या क्षेत्रात मुक्त जीवनाचा पुरस्कार करतात आणि चटकन आनंद मिळवायचा मार्ग डोळ्यापुढे येतो! पण माझी मत वेगळी आहेत आप्पा! माणसाच्या सर्व गरजांचे बाजारीकरण आणि सहजिकरण करू नये. प्रेम हे त्यात काळजीपूर्वक आणि मनापासून वेळ देवून सावकाश करण्याची गोष्ट आहे असे माझे मत आहे ” नरेन्द्र जरा व्याकूळ आणि विचारमग्न स्थितीत असल्याने आपल्या विचारात असलेल्या विषयावर कधी प्रवचन द्यायला लागला ते त्याचे त्यालाच कळले नाही.

आप्पा हसायला लागले! “हा, हा, म्हणजे तुला पडलेला प्रश्न पुरातन आहे! मुली समोर आपले प्रेम कसे व्यक्त करावे? आणि कधी व्यक्त करावे?” आप्पा हसत म्हणाले!

नरेन्द्र ओशाळला!

“अरे मग अडचण काय आहे? वाटलं ते बोलून टाकाव! एकतर मुलगी हो म्हणेल नाहीतर नाही म्हणेल“ आप्पा पुढे म्हणाले

“अहो आप्पा, समोर असलेल्या व्यक्तीच्या भावनांचा आणि सन्मानाचा विचार करावा असं नाही का? विश्वास ठेवून निखळ मैत्री केली आणि याने अपेक्षा भंग केला! असे वाटून तिचे मत फार वाईट होवू शकते! मी असलेली चांगली मैत्रिण गमावून बसेन!“ नरेंद्र म्हणाला.

“अपराधी वाटून घेवू नकोस! प्रेम करणे हा अपराध नाही! दुसऱ्याच्या भावना आणि स्वातंत्र्याची फिकीर न करणे, संवादात काळजी न घेणे, हा अपराध आहे! तू जेन ऑस्टीनचे ‘pride and prejudice’ वाचले आहेस काय? अंहकार किंवा बालपणापासून काही कारणाने झालेले पूर्वग्रह हे माणसाला माणसाशी छान मोकळे संभाषण शांतपणे करण्यातील मुख्य अडथळे असतात” आप्पा म्हणाले.

“बापरे आप्पा, तुम्ही एवढे काही वाचत असाल असे वाटले नव्हते!” नरेन्द्र म्हणाला.

“बघ म्हणजे पूर्वग्रह कसा नकळत आपल्यावर परिणाम करतो! तुला वाटलं, भेळ आणि पाणीपुरी विकणारा आप्पा, तो साहित्य आणि कलेत काय रस घेत असणार! अरे मी नुसता नावा

पुरता ‘बी ए’ नाही झालो. साहित्य आणि वाचन हा माझा छंद कायमच होता! आता मुंबईत पैसा भरपूर मिळाल्या मुळे वेळात वेळ काढून तो छंद जोपासू शकलो मी! हे खरं आहे म्हणा!” आप्पा म्हणाले.

“आप्पा, यू आर ग्रेट! पण मी खरं सांगतो, मी त्या माझ्या मैत्रिणीबद्दल सिरियस आहे! माझी तिच्याशी लग्न करण्याची इच्छा आहे!” नरेन्द्र म्हणाला.

“अरे मग शांतपणे तिच्याशी बोल आणि नंतर तुझ्या आणि तिच्या कुटुंबियांचा विचार करायला विसरू नका!” आप्पा म्हणाले.

“पण तिला नुसतीच निखळ मैत्री अपेक्षित असेल तर?” नरेन्द्र म्हणाला

“मग काय झालं? निदान तू आपल्या मनातील भावना प्रामाणिक पणे व्यक्त केल्या, मनात एक आणि बाहेर दुसरे अशी वागणूक ठेवली नाही याबद्दल तिने तुझे आभारच मानले पाहिजेत!” आप्पा म्हणाले.

“हेही खरे आहे!” नरेन्द्रला आप्पान्चे म्हणणे पटले.

“मंजुळा, लग्न ह्या विषयावर तुझे काय मत आहे?” दुसऱ्या दिवशी लंचमध्ये गप्पा मारताना नरेन्द्रने विषय काढायला उगाचच एक उच्च चर्चा करण्याच्या थाटात प्रश्न टाकला.

“सरळ सांग की स्वत:च्या लग्नाचा विचार चाललाय!” मंजुळा मिष्कीलपणे म्हणाली.

“तुझ्याशी आडवळणाने बोलण्यात काही अर्थ नाही! बोलायला अवघड वाटतंय पण सरळ विचारतो, मंजुळा माझ्याशी लग्न करशील?” नरेन्द्रने ‘काय होईल ते होईल” असे मनात म्हणून बाण सोडला!

मंजुळा जरा गंभीर झाली. क्षणभर खाली मान घालून तिने विचार केला आणि मग मान उंचावून त्याला न्याहाळत प्रश्न टाकला.

“नरेन्द्र, हे बघ, तुला मी, माझे व्यक्तिमत्व, स्वभाव, करियर असे सगळे आवडत असले तरी माझ्या कुटुंबाबद्दल तुला काय माहिती आहे?”

“मला काही माहिती नाही, पण मी सरळ तुझ्या घरी येवून भेटतोच ना? मला सगळीच माहिती कळेल” नरेन्द्र म्हणाला.

मंजुळा मनातून सुखावली! नरेन्द्र त्याच्या प्रोपोजलबद्दल पुर्ण प्रामाणिक आहे हे तिला पटलं होत! त्याचा थेट मार्ग तिला

आवडला होता. तिने नरेन्द्रला घरचा पत्ता दिला आणि रविवारची वेळ ठरवली.

रविवारी सकाळी नरेन्द्र तिने दिलेला पत्ता शोधत तिच्या वस्तीत पोचला. पन्नास वर्षे जुनी चाळ वजा वस्ती दिसत होती. दोन दोन खोल्यांची भिंतीला भिंत लागून असलेली घरे होती. काही लोकानी त्यातच वरती मजला करून खोल्या वाढवल्या होत्या. दाटीवाटी आणि गर्दीचे छोटे रस्ते आणि ड्रेनेज, खाडी, फुले, स्वयंपाकाच्या फोडण्या, मासे असे मुंबईत एकत्र अनुभवास येणारे असंख्य वास! मंजुळाचे दोन खोल्यांचे बैठे घर होते. मंजुळाने दार उघडले आणि त्याला बाहेरच्या खोलीत खुर्चीकडे निर्देश करून बसण्याची खूण केली. आतल्या खोलीकडे तोंड करून तिने हाक मारली.

“आप्पा..?” आप्पा बाहेर आले आणि मंजुळाने ओळख करून दिली, “नरेंद्र, हे आप्पा माझे वडील! आप्पा, हा नरेंद्र, मी काल बोलले ज्याचेबद्दल तो!”

नरेंद्र भांबावला होता आणि त्याला पटकन काय बोलावे सुचत नव्हते! समोर त्याचे ओळखीचे ‘भेळपुरी वाले’ आप्पा उभे होते. काही क्षणात स्वत:ला सावरून त्याने त्यांना वाकून नमस्कार केला आणि फार विचार करायला वेळ न देता तो चटकन म्हणाला.

“आप्पा, मंजुळा तुम्हाला बोललीच असेल, तुमचे आशीर्वाद असतील तर मंजुळशी लग्न करण्याची माझी इच्छा आहे!”

“अरे बस, तुम्हा दोघांच्या इच्छेविरूद्ध मी नाही. पण जरा तुझ्या कुटुंबाची माहिती सांगशील की नाही! आप्पा मिशीत स्मित हास्य करून म्हणाले.

“आप्पा माझे वडील पुण्याला असतात, एक इंजीनियरिंग मेन्युफेक्चरिंग यूनिटमध्ये सीनियर मॅनेजर आहेत.” नरेन्द्र म्हणाला.

“मग त्यांचे आणि तुझ्या आईचे मत, परवानगी वगैरे असे काही आधी असेल की?” आप्पा म्हणाले.

“आप्पा, माझ्या घरी वातावरण जरा मोकळे आहे. माझ्यावर माझ्या आई आणि वडीलांचा पुर्ण विश्वास आहे. मी माझ्या आतापर्यंतच्या ट्रॅक रेकॉर्डने तो मिळवला आहे असे म्हणाना!” नरेन्द्र आत्मविश्वासाने म्हणाला. “तसे नसते तर मी सरळ येथे मंजुळच्या घरी एकटाच पोचलो नसतो! तुम्ही काळजी करून नका! मी त्यांच्याशी बोलून तुमची त्यांची गाठ घालून देतो! “ नरेन्द्र पुढे म्हणाला.

“मग प्रश्नच नाही! मी आत जावून जरा चहा घेऊन येतो! मंजुळा तू बोल याच्या शी!” आप्पा म्हणाले.

“थांबा आप्पा, अरे नरेन्द्र तू तुझे वडील काय करतात ते सांगीतलंस पण आप्पा काय करतात ते तुला सांगायला नको काय?” मंजुळा म्हणाली.

“त्याची गरज नाही मंजुळा! मी “pride and prejudice’ वाचलेय!” नरेन्द्र मिष्कीलपणे म्हणाला!

“आप्पानी हसून त्याच्या खांद्यावर थाप दिली आणि ते आत गेले. मंजुळा बुचकळण्यात पडून त्याच्याकडे बघत होती.

# संगीतातील क्रियापदे

नटराज! अतिशय मनमोहक अशी शंकर बाप्पाची मुद्रा डोळ्यासमोर येते. या त्यांच्या नर्तकाच्या स्वरूपात त्यांनी किती सखोल ज्ञान सांगून ठेवलं आहे. भगवान शिव यांची पंचक्रीत्य किती सहज पणे साधली आहेत. सामान्य माणसाला कळायला सोपे!

हीच किमया आहे संगीत आणि नृत्य या कलांची. भगवान शिव क्रोध आणि आनंद अशा दोन विरोधी भावना व्यक्त करायला याच कलांचा उपयोग करतात. त्यांचा डमरू वाजवून भक्तांना मोहून टाकतात. पद्य रचनेला अर्थपूर्ण बनवणे, त्याच्यात भावनांचा समावेश करणे हे सगळे संगीताचे काम. रामायणसुद्धा पद्य रचना आहे आणि तुलसीदासांनी इतक्या मधूर संगीत रूपात तिचे भाषांतर केले.

संगीताशी किती लहानपणापासून आपला परिचय होतो. अंगाई गीते ऐकणे आणि बाल गीते म्हणून दाखवणे इथून सुरुवात होते. संगीत ऐकणे यानी स्वतःला आनंद मिळतो आणि गाऊन

दाखवण्यानी स्वतःला आणि इतरांना आनंद मिळतो. ऐकणे आणि गाणे या क्रियापदांनी संगीताची सुरुवात होते. एखादा बेसुर गाणारा किंवा बाथरूम सिंगरसुद्धा हास्य विनोद करून आनंदच देऊन जातो. अंताक्षरी सारखे खेळ खेळून प्रवास सुखकर होतो.

भारत देश संगीताच्या बाबतीत फारच भाग्यवान आहे. भारतातील अनेक प्राचीन ग्रंथांची सुरुवात ही मंत्र आणि गायन यानी होते. सामवेद हा पूर्ण संगीतबद्ध आहे. सहस्रवीणा, बासरी आणि ढोलक या वाद्यांचा इतिहाससुद्धा पूर्ण पणे माहीत नाहीये, इतकी प्राचीन आहेत. शहनाईसुद्धा पुष्कळ जुने पण लोकप्रिय वाद्य. आणि तसेच चिपळ्या, शंख, घंटा, टाळ आणि मृदुंग जी वाजवून विठ्ठल भक्त विठ्ठालाचे कौतुक गातात. तानसेन, अमीर खुसरो सारखे कलावंतांनी भारतात संगीत वृद्धिंगत केले. अमीर खुसरो याने सतारीचा निर्माण करून तसेच तबला बनवून संगीत अजून प्रगत केले. पंडित पलुसकरांनी पाश्चात्य संगीतातील पियानो वरून पेटी बनवली.

लता दीदी, आशा भोसले, रफी साहेब, किशोर कुमार अशा गायकांनी संगीतात इतकी मजा आणून टाकली आणि उत्तम

गीतकाराना स्फूर्ति दिली. त्यांची गीते छायागीत किंवा आकाशवाणी वर ऐकत ऐकत आपण मोठे झालो. ब्रिटिश राज्याच्या काळात वॉयलिन, पियानो तसेच गिटार, सॅक्सोफोन याच्याशी भारताचा परिचय झाला. वाद्य वाजवून गायनाची साथ करण्याची एक महत्वपूर्ण क्रिया झाकीर हुसेन, शिवकुमार शर्मा यांसारखे दिग्गज कलाकार करत आलेले आहेत.

आनंद, क्रोध आणि भक्ति या तीन रसांबरोबर वीर रससुद्धा आहे. पूर्वी शंख फुंकून सैन्याला जोशात आणायचे. आता नौदल, वायुदल आणि सेना प्रत्येकाचे वेगळे गीत आणि रचना असते. देशभक्तिपर गीते गाऊन स्वतंत्रता दिवस साजरा होतो.

आणखी एक रस म्हणजे शृंगार! गजल या लोकप्रिय संगीत प्रकारात मुख्यतः या शृंगार आणि प्रेम रसाची अभिव्यक्ति होते. गुलाम आली, मेहदी हसन, बेघम अख्तर आणि जगजित सिंह चित्रा सिंह यांना उत्तम लेखकांची साथ मिळाली आणि त्यांनी हा संगीतप्रकर गाजवला. आणि शांत तसेच भक्ति रसाचा आस्वाद देऊन गेले पंडित भीमसेन जोशी, कुमार गंधर्व, किशोरी अमोणकर, प्रभा अत्रे, पंडित जसराज इत्यादि. त्यांनी वेगवेगळी लोकगीते

हुडकून पुनः आपल्यापर्यंत पोचवली. शास्त्रीय संगीत हे त्यांनी आपले केंद्र बनवले आणि प्रेक्षकांपर्यंत पोचवले. एखाद्या रविवारी निवांत ऐकत बसण्यासाठी आपल्याला हा अमोल साठा सहज उपलब्ध आहे.

नृत्य हे संगीताचे अभिन्न अंग आहे. धर्मेंद्र हेमामालिनी ला हिन्दी चित्रपटात बागेत नाचताना, किंवा शम्मी कपूरला गाण्यावर झुलताना बघून छान वाटतं. हेलेन तर तिच्या नाचण्याने एकदम रहस्यमय वातावरण तयार करते. भरतमुनींनी भरतनाट्यम ची रचना करून आपल्या शरीरातील सममिति दाखवून दिली आणि मुद्रा स्वरूपात पृथ्वीवरील वेगवेगळे पशूपक्षी तसेच निसर्गाचे वर्णन केले. कथक आणि इतर नाट्य प्रकारांनी डौल आणि सौन्दर्य प्रदर्शित केले. नृत्याचसुद्धा गायनासारखच आहे, एखाद्याने येत नसताना जरी केले तरी तो आनंद देऊनच जातो.

आता संगीताचे स्वरूप बदलले. यूट्यूब मुळे सगळी गाणी हवी तेव्हा ऐकू शकतो. पाश्चात्य संगीताचा प्रभाव वाढत चाललाय. गाण्यांची गती आणि लय, गाण्यांचा ढंग बदललाय. संगीत नाटके, ओपेरा अशा रूपात प्राचीन संगीत जनतेपर्यंत पोचते आहे.

कारमध्ये ट्रेन बसमध्ये लोक हेडफोन कानात घालून ऐकत असतात. श्रेया घोशाल अर्जित सिंह आणि शंकर महादेवन सारख्या महान गायकांनी पाश्चात्य आणि भारतीय संगीताचा वेगळाच मेळ घालून दिलाय! त्यात आपण सगळे रममाण होतो. अजूनही शास्त्रीय संगीताचा पाया मात्र टिकून आहे, फक्त वरचे कवच वेगळे. गाणी म्हणणे आणि ऐकणे, नृत्य करणे आणि बघणे तसेच वेगवेगळी वाद्य वृंद वाजवून साथ करणे, कुठलेच कार्य कमी किंवा जास्त दर्जाचे नाही. कलाकाराचे महत्व रसिक प्रेक्षकांमुळेच असते. त्यामुळे सगळ्या वाचकांनी संगीताचा आनंद वेगवेगळ्या मार्गांनी लुटत राहावा हीच कामना!

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या.

साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धी नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com